# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)**

32 वा, मजला, सेंटर-1 बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई - 400005.

दुरध्वनी - (022) 22151847, फॅक्स - (022) 22151867

ई मेल - info.mahasecurity@maharashtra.gov.in, Website : http://www.mahasecurity.gov.in/


# 500 सुरक्षा रक्षकांची कंत्राटी पध्दतीवर नेमणुक प्रतीक्षाधीन यादीसाठी जाहिरात

**[अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख 13/10/2017]**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, **कंत्राटी पध्दतीवर** तसेच खालील अटी व शर्तीवर 500 **पुरूष व महिला सुरक्षा रक्षकांच्या** प्रतीक्षाधीन यादीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

**पात्रतेचे निकष** आणि **अटी व शर्ती**

| अ. क्र. | निकष | पुरूष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|---|
| 1 | वयोमर्यादा | 18 ते 28 वर्षे दि. 01/10/2017 रोजी [30/09/1989 ते 30/09/1999 दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र] | पुरूष उमेदवारांप्रमाणेच |
| 2 | उंची, वजन / छाती | 1. उंची - 170 से.मी. पेक्षा कमी नसावी.<br>2. वजन - 62 कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे.<br>3. छाती - न फुगवता 79 से.मी. वा जास्त. फुगवून - किमान 5 से.मी. [Expansion] | 1. उंची160 से.मी. पेक्षा कमी नसावी.<br>2. वजन - 45 कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे. |
| 3 | शैक्षणिक पात्रता | उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा HSC [12 वी] पास. | पुरूष उमेदवारांप्रमाणेच |
| 4 | अधिवास निकष | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे. | |
| 5 | शारिरीक चाचणी | 1. 1600 मीटर धावणे. [30 **गुण**]<br>2. पुलअप्स [**10 साठी -20 गुण**] [**एकूण 50 गुण**] | 1. 800 मीटर धावणे [**50 गुण**] |
| 6 | 12वी च्या गुणांचे भार प्राधान्य [Waitage] | 12वी परिक्षेत 70% पेक्षा अधिक गुण - 50 गुण<br>12वी परिक्षेत 60% ते 70% गुण - 40 गुण<br>12वी परिक्षेत 50% ते 60% गुण - 30 गुण<br>12वी परिक्षेत 40% ते 50% गुण - 10 गुण<br>12वी परिक्षेत 40% पेक्षा कमी गुण - 00 गुण | |
| 7 | **कंत्राटानुसार मोबदला - मासिक रु.** 14,000/- [Less-EPF+ESIC+PT= **नक्त रुपये** 12,362/-] | | |

2. **कर्तव्याच्या मुख्य अटी व शर्ती**

2.1. **कर्तव्य :- सुरक्षा रक्षक म्हणून महाराष्ट्रातल्या कोणत्याही ठिकाणी किंवा महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे कर्तव्य देण्यात येईल.**

2.2. **सदरचे कर्तव्य हे कंत्राटी स्वरुपाचे राहील. सुरक्षा रक्षकांबरोबरच्या कंत्राटास भविष्यात कधीही कायम स्वरुप येणार नाही.**

2.3. कंत्राटा दरम्यान सुरक्षा रक्षकास कोणत्याही राजकीय, कामगार अथवा व्यवसायिक संघटनेचा [Union] सदस्य होता येणार नाही, अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच वर नमुद अथवा इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कारवायांमध्ये भाग घेता येणार नाही.

2.4. महामंडळाकडे सुरक्षेची मागणी करणाऱ्या आस्थापना [Clients] यांच्या मागणी नुसार कर्तव्य देण्यात येईल.

2.5. कोणत्याही उमेदवाराचे कंत्राट, कोणत्याही दिवशी, कोणतीही पूर्व सुचना, आणि तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा [Terminate] हक्क महामंडळाकडे राहील.

2.6. प्रतीक्षाधीन यादीवरील निवड झालेल्या उमेदवारास 4 आठवडयांचे प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणासाठी येणारा खर्च रु. 6000/- उमेदवारास प्रशिक्षणास जाण्यापूर्वी ठेव म्हणून [Deposit] महामंडळाकडे [DD/POfvg MSSC] द्वारा जमा करावा लागेल. सदरची रक्कम सेवेत रूजू झाल्यानंतर 6 महिन्यांमध्ये प्रत्येक महिन्यास रु. 1000/- प्रमाणे उमेदवारांस परत करण्यात येईल.

3. सुरक्षा रक्षकांबरोबरचे कंत्राट चारित्र्य पडताळणी अहवालांच्या व वैद्यकिय चाचणीच्या अधीन राहील. अहवाल आक्षेपार्ह आढळल्यास कंत्राट रद्द केले जाईल.
4. सुरक्षा रक्षकांना कोणतेही भत्ते [**TA/DA/निवासस्थान**] अनुज्ञेय नसतील.
5. सुरक्षा रक्षकांनी महामंडळासोबतच्या करारात असतांना कोणतीही नोकरी अथवा धंदा, [**पुर्णवेळ किंवा अंश कालीन**] करता येणार नाही.
6. महामंडळाबरोबर कंत्राट झाल्यानंतर उमेदवारांस राज्य कामगार विमा योजनेचे [ESIC] लाभ देय होतील.
7. **पात्र व इच्छुक उमेदवारांनी** http://www.mahasecurity.gov.in/applicationform.php **या वेब - लिंकवर** online **अर्ज भरावा. ही जाहिरात आणि भराव्याच्या अर्जाचा नमूना** www.mahasecurity.gov.in **या वेब साईटवर** Advertisement **या** tab **मध्ये उपलब्ध आहे. आपले अर्ज दि.** 13/10/2017 **रोजीपर्यंत सादर करावे. हा अर्ज कोठल्याही** smart phone **वरून** / internet **असलेल्या** computer **वरून सदर वेब लिंकद्वारे भरता येईल. दुसऱ्या कोठल्याही पध्दतीने अर्ज पाठवू नयेत**.
8. अर्जासोबत भरावयाचे **प्रक्रिया शुल्क** रू. 200/- हे वेबलिंकवर अर्ज भरण्यापूर्वी **NEFT द्वारे** महामंडळाच्या भारतीय स्टेट बँकेमध्ये [**शाखा - कफपरेड** (05345), **मुंबई - IFSC Code - SBIN0005345 - A/c No. 33853257644**] या खात्यामध्ये जमा करावे. **NEFT चा UTR Number** वेबलिंकवरील अर्जामध्ये न चुकता नमुद करावा. प्रक्रिया-शुल्काशिवाय सादर केलेले अर्ज रद्द समजले जातील.
9. योग्य रित्या अर्ज करणाऱ्या अर्जदारांना शारीरिक चाचणीची तारीख महामंडळाच्या संकेतस्थळावरून [**www.mahasecurity.gov.in**] कळविण्यात येईल. याकरीता 13/10/2017 नंतर उपरोक्त संकेतस्थळ पहावे. **शारीरिक चाचणीची तारीख समजली / कळली नव्हती, ही सबब मान्य केली जाणार नाही**.
10. प्रतीक्षाधीन यादी निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये तसेच वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार महामंडळास असेल.
11. **प्रतीक्षाधीन यादीच्या संख्येत वाढ / घट करण्याचा अधिकार महामंडळाकडे राहील**.